
दैनिक
wwww.lokaarambh.com
# लोक आरंभ
संपादक: राहुल मारोतीराव वाईकर
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
बीड | वर्ष - ०४ थे | अंक ४८ | रविवार २ फेब्रुवारी २०२६ | RNI/MAHMAR/2022/84215 Postal No LSB/Beed/RNP-270/2026-2028 | पान ४ | किंमत २ रू
Beed | year - ०4 th | Issue 48 | Monday,2February 2026 | RNI/MAHMAR/2022/84215 Postal No LSB/Beed/RNP-270/2026-2028 | Page 4 | Price 2

# मुंबई महापालिकेत एकनाथ शिंदेंची सर्वात मोठी मास्टर खेळी

गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात राजकीय घडामोडी वेगाने घडत आहेत. मुंबईतील महापालिका निवडणुका पार पडल्यानंतर दोन आठवडे उलटले आहेत. तरी अद्याप काही महापालिकेत महापौर विराजमान झालेला नाही. मुंबई महानगरपालिकेच्या सत्तासंघर्षात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोठी मास्टर खेळी खेळली आहे. महापालिकेत आपला प्रभाव वाढवण्यासाठी एकनाथ शिंदे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांना खिंडार पाडले आहे. एकनाथ शिंदे यांनी राष्ट्रवादीच्या एकूण ४ नगरसेवकांना आपल्या गटात खेचण्यात यश मिळवले आहे. या राजकीय भूकंपामुळे महापालिकेत शिंदे सेनेची ताकद वाढली असून महायुतीचा सत्तेचा मार्ग अधिक सुकर झाला आहे. राष्ट्रवादीला मोठा धक्का मिळालेल्या माहितीनुसार, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसचे ३ नवनिर्वाचित नगरसेवक आणि शरद पवार गटाचा १ नगरसेवक अशा एकूण चार जणांनी शिवसेना शिंदे गटात सहभागी होण्याचा निर्णय घेतला



आहे. हे चारही नगरसेवक शिवसेना शिंदे सेनेच्या मुख्य गटात विलीन होऊन एकच गट स्थापन करणार आहेत. यामुळे विरोधकांच्या गोटात मोठी खळबळ उडाली आहे. आकड्यांचे नवे गणित या पक्षप्रवेशामुळे मुंबई महानगरपालिकेतील संख्याबळाचे चित्र पूर्णपणे बदलले आहे. याआधी शिवसेना शिंदे गटाकडे २९ नगरसेवक होते, आता ही संख्या ३३ वर पोहोचली आहे. तर भाजप आणि शिवसेना शिंदे गट यांचे एकत्रित संख्याबळ आता १२२ झाले आहे, जे बहुमतासाठी आवश्यक असलेल्या ११४ च्या आकड्यापेक्षा कितीतरी जास्त आहे. निवडून आलेल्या सदस्यांची संख्या वाढल्यामुळे शिवसेना शिंदे गटाला मिळणाऱ्या नामनिर्देशित (Nominated) नगरसेवकांच्या कोट्यातही वाढ होणार आहे.

## राजकीय पुनर्रचनेचे संकेत

या ऐतिहासिक घडामोडीमुळे मुंबईच्या राजकारणात गट विलीनीकरणाचा नवा पॅटर्न पाहायला मिळत आहे. शरद पवार गटाच्या नगरसेवकाने शिवसेना शिंदे गटाची वाट धरल्याने महाविकास आघाडीत समन्वयाचा अभाव असल्याचे स्पष्ट झाले आहे. तर दुसरीकडे, अजित पवार गटाच्या नगरसेवकांनी शिंदे सेनेत जाणे हा महायुतीमधील अंतर्गत रणनीतीचा भाग असल्याचे बोलले जात आहे. या मास्टर खेळीमुळे केवळ आकड्यांचे गणितच सुधारले नाही, तर आगामी स्थायी समिती आणि इतर वैधानिक समित्यांच्या निवडीमध्येही एकनाथ शिंदेंचा शब्द महत्त्वाचा ठरणार आहे. विशेषतः अमेय घोले यांच्याकडे गटनेतेपद दिल्यास, मुंबईतील तरुण मतदारांना आकर्षित करण्यासाठी आणि महापालिकेच्या कारभारात आक्रमकपणे उतरण्यासाठी शिंदे सेनेला एक नवा चेहरा मिळणार आहे.

# रासेयो शिबिरातून स्वच्छतेची जनजागृती; 'स्वच्छ गाव, सुंदर गाव' मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद




बीड (प्रतिनिधी): देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी महाविद्यालय, बीड येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे शिवणी येथे सुरू असलेल्या सातदिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिरांतर्गत 'स्वच्छ गाव, सुंदर गाव' हा उपक्रम शुक्रवारी उत्साहात राबविण्यात आला. या उपक्रमात स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी गावातील रस्ते, सार्वजनिक ठिकाणे, शाळा परिसर तसेच विविध भागांची स्वच्छता करून ग्रामस्थांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती केली.

यावेळी विद्यार्थ्यांनी सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन, कचरा वर्गीकरण तसेच परिसर स्वच्छ ठेवण्याचे महत्त्व ग्रामस्थांना समजावून सांगितले. विद्यार्थ्यांनी गावाजवळील नदी स्वच्छ करून जलसंवर्धनाचा संदेश दिला. नदी परिसरातील कचरा व गाळ काढून नदी स्वच्छ करण्याचा उपक्रम राबविण्यात आला. तसेच शोषखड्डे व पाझर खड्डे तयार करून पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्याबाबतही जनजागृती करण्यात आली.

ग्रामस्थांनीही विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक करत उत्स्फूर्त सहकार्य केले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.सुनील जोंधळे, प्रा. किशोर वाघमारे, प्रा.सुरेश वाघमारे, प्रा.श्वेता वंजारे, प्रा. वृषाली लोखंडे, प्रा. सुप्रिया ससाणे तसेच प्रा.रंजना जोगदंड यांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाचे सर्व स्वयंसेवक मोठ्या संख्येने आणि उत्साहाने या मोहिमेत सहभागी झाले होते.

# शेतकरी व पशुधन हितासाठी अभिनव संशोधनास भारत सरकारचे पेटंट

## रोहित चव्हाणचे गौरवशाली यश; गेवराईचे नाव राष्ट्रीय पातळीवर केले उज्ज्वल

गेवराई : प्रतिनिधी

शेतकरी आणि पशुधन संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या अभिनव संशोधनास भारत सरकारकडून पेटंट (डिझाइन नोंदणी) प्राप्त झाल्याने गेवराई तालुक्याचे नाव राष्ट्रीय पातळीवर उज्ज्वल झाले आहे. व्हेटरनरी शिक्षण घेत असताना रोहित राजेंद्र चव्हाण याने केलेल्या संशोधनास भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून 'डिझाइन अधिनियम 2000' अंतर्गत अधिकृत नोंदणी मिळाली असून हे यश ग्रामीण भागातील तरुण संशोधकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

गेवराई कृषी कार्यालयातील सहाय्यक कृषी अधिकारी राजेंद्र चव्हाण यांचा मुलगा रोहित चव्हाण याने विकसित केलेल्या संशोधनाचे नाव "आपत्तीच्या वेळी पशुधनाच्या सुरक्षित बचावासाठी पशूंना नियंत्रित करून सोडवणारे विशेष उपकरण" असे आहे. या संशोधनामध्ये पूर, आग, भूकंप, अपघात अशा नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तीच्या काळात अडकलेल्या पशुधनाचा सुरक्षित, वेदनारहित व प्रभावी पद्धतीने बचाव करण्यासाठी विशेष उपकरणाची रचना करण्यात आली आहे. सदरील उपकरणामुळे पशुधनाला इजा न होता त्यांना नियंत्रित करणे व आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ सुटका करणे शक्य होणार आहे.



आपत्ती व्यवस्थापनाच्या वेळी पशुधन वाचवताना पशुपालक, पशुवैद्यक व बचाव पथकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा वेळी हे अभिनव उपकरण अत्यंत उपयुक्त ठरणार असून शेतकरी, पशुसंवर्धन विभाग, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा व स्वयंसेवी संस्थांसाठी हे संशोधन मोलाचे ठरेल, असा विश्वास तज्ज्ञांकडून व्यक्त केला जात आहे. या संशोधनास भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून डिझाइन नोंदणी मिळाल्यामुळे रोहित चव्हाण याच्या कार्याची अधिकृत दखल घेण्यात आली आहे. विशेष म्हणजे ग्रामीण भागातील तरुण विद्यार्थ्याने व्हेटरनरी शिक्षणादरम्यान असे नाविन्यपूर्ण संशोधन करून राष्ट्रीय स्तरावर ओळख निर्माण करणे ही अभिमानाची बाब मानली जात आहे. दरम्यान शेतकरी हितासाठी व पशुधन संरक्षणासाठी असे संशोधन भविष्यात क्रांतिकारी बदल घडवेल, असा विश्वास गावरान ॲग्रो प्रोड्यूसर कंपनी लिमिटेड, गेवराईचे अध्यक्ष भाऊसाहेब लवटे, यांनी यावेळी व्यक्त केला. रोहित चव्हाण याच्या या यशामुळे गेवराई तालुक्यासह बीड जिल्ह्याच्या शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील प्रतिष्ठेत भर पडली असून भविष्यात त्यांच्या संशोधनाचा प्रत्यक्ष वापर शेतकरी व पशुपालकांसाठी दिलासादायक ठरणार आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल रोहित राजेंद्र चव्हाण याचे सर्वस्तरातून अभिनंदन होत असून पुढील संशोधन कार्यासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# पाटोद्यात मोठ्या उत्साहात पार पडली मंथन प्रज्ञाशोध परीक्षा

## --- तालुक्यातील २९१ विद्यार्थ्यांचा सहभाग-

पाटोदा । प्रतिनिधी

सध्याच्या स्पर्धेच्या युगात बालवयापासूनच विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा. या उद्देशातून त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची माहिती व्हावी,या हेतूने पाटोदा येथील ओम कोचिंग क्लासेस चे संचालक प्रा.सोमीनाथ खंडागळे यांच्या समन्वयातून रविवार रोजी मंथन अकॅडमी अहिल्यानगर संचलित मंथन प्रज्ञाशोध ही परीक्षा पार पडली.

पाटोदा शहरातील संत बाळूदेव महाराज विद्यालय केंद्रावर तब्बल २९१ विद्यार्थ्यांनी या परीक्षेतून आपले टॅलेंट आजमावले आहे.

सध्याच्या स्पर्धा परीक्षांच्या युगात विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा विषयी माहिती असणे गरजेचे आहे. या हेतूने मागील ६ वर्षांपासून मंथन प्रज्ञाशोध ही बालवयासाठी जनरल नॉलेज तसेच इतर उपयुक्त विषयांवर आधारित स्पर्धा परीक्षा घेण्यात येते. पहिली ते आठवीचे विद्यार्थी या परीक्षेमध्ये सहभागी होतात.

या परीक्षांमध्ये भाषा गणित,बुद्धिमत्ता,इंग्रजी अशा विषयांमध्ये परीक्षा होते.

पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांना भाषा, गणित,इंग्रजी आणि परिसर अभ्यास असा एकच पेपर तर तिसरी ते आठवी च्या




विद्यार्थ्यांना भाषा गणित,बुद्धिमत्ता, इंग्रजी,विज्ञान भूगोल या विषयांवर आधारित ७५ प्रश्न संख्या असलेले दोन पेपर असतात. पहिली आणि दुसरीच्या विद्यार्थ्यांना १५० गुणांची तर तिसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना ३०० गुणांची ही परीक्षा प्रत्येक वर्षी घेण्यात येत आहे. पाटोदा तालुक्यात या परीक्षेला विद्यार्थ्यांकडून आता चांगला प्रतिसाद मिळत असून यंदा तब्बल २९१ विद्यार्थ्यांनी

पाटोदा शहरातील संत बाळूदेव महाराज / महिला महाविद्यालयात ही परीक्षा दिली.

या परीक्षेसाठी संत बाळूदेव महाराज विद्यालयाचे मुख्याध्यापक व शिक्षक वृदांचे तसेच तालुकाभरातून आलेल्या शिक्षकांचे अनमोल सहकार्य मिळाले.

### विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची आवड निर्माण होते; चांगला प्रतिसाद

विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची आवड निर्माण व्हावी,त्याची तयारी व्हावी यासारख्या उदात्य हेतू घेणारे पहिले पाऊल म्हणून मंथन ही परीक्षा घेण्यात येत असून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात वाढ व्हावी यासाठी ही परीक्षा आयोजित करण्यात येत आहे. यामध्ये राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय आणि केंद्रस्तरीय अशी बक्षिसे देण्यात येणार असून सध्याच्या स्पर्धा परीक्षांच्या युगामध्ये विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे स्वरूप माहिती व्हावे याच उद्देशाने या परीक्षेचे आयोजन आपण करत आहोत. पाटोदा तालुक्यात विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

**-प्रा.सोमीनाथ खंडागळे,**
**परीक्षा समन्वयक पाटोदा**



माजलगाव : तालुक्यातील केसापुरी येथील ग्रामस्थांनी स्व अजितदादा पवार यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण केली यावेळी सरपंच भारत आबा साबळे,मा सरपंच विलास साळवे, सदाभाऊ मोडगे लक्ष्मण आगे, छबन घाडगे बा अशोक जागडे शिवाजी जोगडे लक्ष्मण कोरडे, उप सरपंच मैनोझीन शेख, सोमनाथ राउत, मुंजाभाऊ साबळे, जनाबापू निंबाळकर, रातनेश्वर निंबाळकर, संतोष म्हात्रे, अमोल सोळंके गोपाल जाधव, पप्पु भारसाकडे गणेश भारसावडे, दत्ता जोगडे, विशाल धारक, विकास निंबाळकर आदी ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते

# मराठा वधु वर परिचय पुस्तिकेचे शहाजी उमाप यांच्या हस्ते विमोचन

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : मराठा वधू वर सूचक मंडळ नांदेडच्या वतीने घेण्यात आलेल्या बावीसाव्या मराठा वधू वर परिचय पुस्तिकेचे विमोचन नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या शुभहस्ते करण्यात आले.याप्रसंगी वधुवर परिचय मंडळाचे संस्थापक कार्याध्यक्ष संभाजीराव शिंदे मंडळाचे सचिव प्रा.संतोष देवराये हे उपस्थित होते. मागील दोन दशकापासून



मराठा समाजातील विवाह इच्छूक वधू-वरांना उचित आणि अनुरूप असा जोडीदार निवडता यावा यासाठी मराठा वधू वर सूचक मंडळ प्रतिवर्षी परिचय मेळावे आयोजित करीत असते.परिचय मेळाव्यातून प्राप्त झालेल्या स्वपरिचय पत्राचे संकलन करून एक विशेष पुस्तिका तयार करण्यात येते.समाजातील उच्चशिक्षित वधूवरांना योग्य असा जोडीदार निवडण्यासाठी ही पुस्तिका उपयोगी पडेल असे प्रतिपादन शहाजी उमाप यांनी या प्रसंगी केले.नि:शुल्क चालवला जाणारा हा उपक्रम मराठा समाजासाठी फार उपयुक्त ठरत असल्याची भावना आज मराठा समाजामध्ये पाहायला मिळते.सदर पुस्तिका विजयनगर हनुमान मंदिर मंगल कार्यालय या ठिकाणी उपलब्ध असेल,असे मंडळाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

दैनिक लोकआरंभ
सोमवार २ फेब्रुवारी २०२६
www.lokaarambh.com



## संपादकीय

### वैद्यकीय शिक्षणासाठी नागरिकत्व त्यागून एनआरआय कोट्यातून प्रवेशाची चढाओढ

भारतीय शिक्षण व्यवस्थेत वैद्यकीय प्रवेशासाठी अत्यंत कठीण मानल्या जाणाऱ्या 'नीट' परीक्षेनंतर आता एक धक्कादायक आणि तितकाच विदारक कल समोर आला आहे. केवळ एका जागेसाठी लाखो विद्यार्थी जीवतोड मेहनत करत असताना, दुसरीकडे भारतीय नागरिकत्वाचा त्याग करून 'अनिवासी भारतीय' (NRI) होण्याकडे विद्यार्थ्यांचा ओढा वाढला आहे. मेडिकल काउंसलिंग कमिटीने (MCC) नुकतीच २०२५-२६ शैक्षणिक वर्षाच्या तिसऱ्या फेरीसाठी अशा ८११ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे, ज्यांनी केवळ प्रवेश प्रक्रियेत सुलभता मिळावी म्हणून स्वतःची ओळख बदलून एनआरआय श्रेणी निवडली आहे. ही आकडेवारी केवळ प्रवेशाची धडपड नसून, ती भारतीय शिक्षण व्यवस्थेतील वाढत्या स्पर्धेचे आणि त्यातून शोधल्या जाणाऱ्या पळवाटांचे प्रतिबिंब आहे.

या कलमागील सर्वात मुख्य कारण म्हणजे एनआरआय कोट्यातील अत्यंत शिथिल असलेली प्रवेश पात्रता. सामान्य कोट्यातून सरकारी किंवा नामांकित खाजगी महाविद्यालयात प्रवेश मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांना गगनचुंबी गुणांची (कट-ऑफ) गरज असते, मात्र एनआरआय कोट्यात ही स्पर्धा कमालीची कमी होते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, जिथे हजारो गुण मिळवूनही विद्यार्थ्यांना प्रवेशाची खात्री नसते, तिथे या विशेष श्रेणीतील पहिल्या गटात केवळ १० टक्के गुणांवर, म्हणजेच ८०० पैकी साधारण ८२ गुणांवरही प्रवेशाचे दरवाजे उघडले जातात. तर दुसऱ्या श्रेणीतील जवळच्या नातेवाईकांच्या कोट्यातून केवळ २८ गुणांवरही विद्यार्थी वैद्यकीय शिक्षणाची संधी शोधत आहेत. ही दरी गुणवत्ता आणि आर्थिक सक्षमता यातील संघर्षाला अधोरेखित करते.

आर्थिक बळ आणि गुणवत्तेचे समीकरण

हे प्रवेश मिळवणे तांत्रिकदृष्ट्या सोपे असले तरी, त्यासाठी मोजावी लागणारी किंमत सामान्य भारतीयांच्या कल्पनेपलीकडची आहे. एनआरआय कोट्यातून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयांचे शुल्क प्रचंड असते. पदव्युत्तर शिक्षणासाठी तर हे शुल्क ४५ लाख रुपयांपासून थेट ९५ लाख रुपयांपर्यंत पोहोचते. हे शुल्क राज्य आणि विद्यापीठांनुसार बदलत असले तरी, 'पैसा फेको, सीट मिळवा' अशीच काहीशी स्थिती या कोट्यामुळे निर्माण झाल्याचे दिसते. अनेकदा या जागा रिक्त राहिल्यास त्यांचे रूपांतर मॅनेजमेंट कोट्यात केले जाते, जिथे शुल्कात थोडी सवलत मिळू शकते, परंतु मूळ हेतू हा कमी गुणांवर प्रवेश मिळवणे हाच असतो.

या ८११ उमेदवारांच्या वर्गीकरणाकडे पाहिल्यास असे लक्षात येते की, स्वतः एनआरआय असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ११३ इतकी मर्यादित आहे, तर ६९८ विद्यार्थ्यांनी केवळ आपल्या जवळच्या नातेवाईकांच्या एनआरआय स्टेटसचा आधार घेऊन या कोट्याचा लाभ घेण्याचा प्रयत्न केला आहे. ही आकडेवारी स्पष्ट करते की, भारतात वैद्यकीय पदवी मिळवणे हे आता केवळ बुद्धिमत्तेवर अवलंबून न राहता, उमेदवाराची आर्थिक पार्श्वभूमी आणि जागतिक स्तरावरील त्याच्या ओळखीवर अधिक अवलंबून होत चालले आहे. भारतीय नागरिकत्व सोडून विदेशी ओळख स्वीकारण्याची ही धडपड भविष्यातील डॉक्टरांच्या गुणवत्तेवर आणि देशातील शिक्षण व्यवस्थेतील नैतिकतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे

प्रशांत बाफना /8055440385

## तोतया पोलीस अधिकाऱ्याकडून व्यावसायिकाची फसवणूक ;पाच लाखांच्या खंडणीची मागणी

-अहिल्यानगर/ -पोलीस अधिकारी असल्याचे भासवून एका व्यावसायिकाला खोट्या गुन्ह्याची भीती दाखवत 5 लाख रुपयांची खंडणी मागणाऱ्या अज्ञात भामट्यांविरुद्ध अहिल्यानगर सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी विनीत नानासाहेब जाधव (वय 38, रा. सावेडी, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे.




फिर्यादी विनीत जाधव यांना 29 जुलै 2025 ते 30 जानेवारी 2026 या सहा महिन्यांच्या कालावधीत दोन वेगवेगळ्या मोबाईल क्रमांकावरून वारंवार फोन येत होते. समोरून बोलणाऱ्या व्यक्तीने आपण पोलीस अधिकारी असल्याचे भासवले आणि जाधव यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली. हा खोटा गुन्हा टाळण्यासाठी संशयित आरोपींनी त्यांच्याकडे 5 लाख रुपयांच्या खंडणीची मागणी केली.सततच्या धमक्यांमुळे घाबरलेल्या जाधव यांनी अखेर सायबर पोलिसांकडे धाव घेत फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी दोन मोबाईल क्रमांकधारक अनोळखी व्यक्तींसह त्यांच्या इतर अज्ञात साथीदारांविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार गुन्हा नोंदवला आहे. सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सागर ढिकले अधिक तपास करीत आहेत

## अहिल्यानगरमध्ये नायब तहसीलदाराची रेल्वेगाडी खाली उडी घेत आत्महत्या

अहिल्यानगर/
– अहिल्यानगरच्या जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षात कार्यरत असलेले नायब तहसीलदार किरण रामदास देवतरसे (वय ५७, रा.भिंगार) यांनी रेल्वे गाडीखाली उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना ३१ जानेवारीला सकाळी ८.३० च्या सुरास घडली.

सदरची घटना एम आयडीसी ते निंबळक जाणाऱ्या रोडवर असलेल्या रेल्वे गेट जवळ घडली आहे. सकाळी ८.३० च्या सुमारास अमरावती ते पुणे जाणाऱ्या रेल्वे गाडीखाली एकाने उडी घेऊन आत्महत्या केल्याचे काही नागरिकांच्या निदर्शनास



आल्यावर त्यांनी एमआयडीसी पोलिसांना माहिती कळविली. ही माहिती मिळताच स.पो.नि. माणिक चौधरी यांच्यासह पथकाने घटनास्थळी धाव घेतली. मयताची ओळख पटविण्याचा प्रयत्न केला असता ते नायब तहसीलदार किरण देवतरसे हे असल्याचे समोर आले.

पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णवाहिकेद्वारे जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठविला. या प्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली आहे. नायब तहसिलदार देवतरसे यांनी आत्महत्या का केली? याचे कारण समजू शकले नाही. या घटनेने महसूल विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांध्ये हळहळ व्यक्त होत आहे

## संघर्ष, जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर स्वप्नपूर्ती

### शाहानवाज दोसानी यशस्वीपणे डॉक्टर; एफएमजीई परीक्षेत १९० गुण !

माहूर प्रतिनिधी जावेद शेख
: राष्ट्रीय वैद्यकीय विज्ञान परीक्षा मंडळामार्फत (NBE) आयोजित करण्यात आलेल्या एफएमजीई (Foreign Medical Graduate Examination) डिसेंबर २०२५ परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, माहूर येथील शाहानवाज दोसानी याने १९० गुण मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे. या यशामुळे त्याचे डॉक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण झाले असून, दोसानी परिवारासह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण पसरले आहे.
शाहानवाज याने किर्गिस्तान येथे एमबीबीएसचे शिक्षण पूर्ण केले. परदेशात राहून शिक्षण घेत असताना आर्थिक, शैक्षणिक व वैयक्तिक अशा अनेक अडचणींचा सामना त्याला करावा लागला. प्रतिकूल परिस्थितीतही त्याने



हार न मानता आपले ध्येय कायम ठेवले. एफएमजीईसारखी कठीण आणि स्पर्धात्मक परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी त्याने दिवस-रात्र अभ्यास करून अथक परिश्रम घेतले.
दरम्यान, आईच्या अकाली निधनामुळे त्याच्या आयुष्यात मोठा आघात झाला होता. त्या दुःखातून सावरणे त्याच्यासाठी सोपे नव्हते. मात्र, ज्या आजाराने आईला गमावले, त्याच आजारावर उपचार करणारा डॉक्टर बनण्याचा निर्धार त्याने मनाशी पक्का केला. आईचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्याने अधिक जोमाने अभ्यासाला सुरुवात केली आणि अखेर आपल्या जिद्दीच्या बळावर यश मिळवले.या उल्लेखनीय कामगिरीमुळे , कुटुंबासाठी हा अभिमानाचा आणि आनंदाचा क्षण आहे. त्याच्या या यशाबद्दल नातेवाईक, मित्रपरिवार, शिक्षक व नागरिकांकडून अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.
संघर्षातून यशाकडे वाटचाल करणाऱ्या शाहानवाजची ही कामगिरी इतर विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी ठरत असून, त्याच्या पुढील वैद्यकीय सेवेसाठी सर्वत्र शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

## अजब निसर्ग'

' 'निसर्ग फक्त दिसत नाही,तो सतत बोलत असतो.कधी किलबिलाटातून,कधी डरकाळीतून,तर कधी शांत गुणगुणीतून.या आवाजांच्या भाषेत दडलेलं संवादविश्व उलगडून दाखवणाऱ्या या ज्ञानवर्धक व विचारप्रवर्तक लेख

माणसं एकमेकांशी बोलून आपल्या भावना व्यक्त करतात.निसर्गातील अन्य जीवांकडे माणसासारखी भाषा नसते.ते जीव आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे ध्वनी निर्माण करतात.पहाटे सुरू होणाऱ्या पक्ष्यांच्या किलबिलाटापासून ते रात्री दचकवणाऱ्या रातकिड्यांच्या किरकिरीपर्यंत निसर्गाचा साऊंड ट्रॅक सतत सुरू असतो.वाघाची डरकाळी,बेडकाची डरांव डरांव,कोकिळची सुमधुर शीळ,सापाचं फुस्स-फुस्स,गाई-म्हशींचं हंबरणं,डासांची गुणगुण, माकडांचे हुंकार असे वेगवेगळे ध्वनी निसर्गात कायम उमटत असतात. राग-प्रेम-भीती अशा आपल्या भावना याच आवाजांमधून तर एकमेकांपर्यंत पोहोचविण्यात हे जीव यशस्वी ठरतात.सस्तन प्राणी,पक्षी,सरपटणारे प्राणी,कीटक, असे निसर्गातले सगळेच जीव जरी आवाज काढत असले,ध्वनी निर्माण करत असले तरी या सगळ्यांची ध्वनी निर्माण करण्याची पद्धत मात्र वेगवेगळी आहे.

किटकामध्ये स्वरयंत्र नसते.पण निसर्गाने त्यांना आवाज करण्यासाठी एक अजब रचना दिली आहे. 'सिकाडा' हा किटक 'बझझझ..किर्रर..
बझझझ असा काहीसा आवाज काढतो व



खटका दाबावा तसा अचानक तो बंदही होतो. सिकाडांमधील नरांच्या पोटावर आणि छातीच्या जवळ 'टिम्बल'
असते.हा अवयव पातळ पण कडक पडद्यासारखा असतो. नर सिकाडा आपल्या फुफ्फुसात हवा भरून घेतो आणि ती जोराने बाहेर फेकताना या ' टिम्बल 'च्या सहाय्याने आवाजाची पट्टी वर- खाली करतो.नर सिकाडा हे गाणे मादीला आकर्षित करण्यासाठी गात असतो.पण अनेक प्रजातींमधील माद्या असा आवाजी प्रतिसाद देऊ शकत नाहीत. फक्त त्या आवाजाच्या रोखाने नराला शोधत येतात. सिकाडा नरांचा आवाज अगदी अर्ध्या किलोमीटर अंतरापर्यंत सहज ऐकू जातो.

क्रिकेट अर्थात रातकिडे हवेची मदत न घेता आपल्याच शरीरातून आवाज निर्माण करतात. हे टोळ,नाकतोडे यांच्या कुटुंबातले आहेत. क्रिकेटना त्यांच्या पुढच्या पंखावर आवाज निर्माण करण्यासाठी खास अवयवच दिलेला असतो. पंखाचा विस्तार असलेल्या या भागाला कंगव्यासारखे दाते असतात आणि आवाज निर्माण करताना क्रिकेट तथा रातकिडा हे दाते एकमेकांना घासतो आणि त्यातूनच त्याची 'किर किर 'सुरू होते. सिकाडाच्या मादीप्रमाणेच क्रिकेटच्या माद्यांनाही आवाज करण्याचा अवयव नसतो,त्यामुळे त्या काही बोलत नाहीत.जराही खंड न पडता ऐकू येणारी रातकिड्याची किरकिर एकसुरी वाटत असली तर त्यातही वैविध्य असते.म्हणजे नर जेव्हा मादीला आकर्षित करण्यासाठी, आमंत्रण देण्यासाठी आवाज करतो तो वेगळा असतो.

सस्तन प्राणी त्यांच्या गळ्यातल्या स्वरयंत्राच्या मदतीने आवाज काढतात. पक्ष्यांच्या गळ्यात देखील स्वरयंत्रच असतं, मात्र त्याची रचना सस्तन प्राण्यांच्या गळ्यातील स्वरयंत्रापेक्षा वेगळी असते.सस्तन प्राण्यांच्या ( म्हणजे माणसांच्या ही!) गळ्यातील स्वरयंत्र (लिरिंक्स)म्हणजेच प्रत्यक्षात त्यांच्या श्वासनलिकेवरील झाकण असतं,ज्यावर फुफ्फुसांतून बाहेर पडणारी हवा आदळते आणि तोंडाच्या पोकळीत फिरते.त्यामुळे वेगवेगळे ध्वनी निर्माण होतात.पक्ष्यांच्या गळ्यातील स्वरयंत्र ( सिरिंक्स) हे त्यांच्या श्वासनलिकेच्या तळाशी असते.याचा आकार उलट्या इंग्रजी वाय अक्षरासारखा असतो. त्यामुळे पक्षी एकाचवेळी दोन आवाज आपल्या गळ्यातून काढू शकतात. कीटक आणि सरपटणारे प्राणी मात्र सस्तन प्राणी व पक्ष्यांप्रमाणे गळ्यातून आवाज काढू शकत नाहीत.

समुद्रात राहणाऱ्या सस्तन प्राण्यांमध्ये दोन प्रकारे आवाज काढण्याची क्षमता पाहायला मिळते.सील्स,सी लायन असे प्राणी जमिनीवरील सस्तन प्राण्यांप्रमाणेच आपल्या स्वरयंत्राच्या मदतीने आवाज काढतात,तर व्हेल्स (विशेषतः दात असलेले)
आपल्या स्वरयंत्राबरोबरच ब्लो होलजवळच्या एअर सॅक्सचा वापर करूनही आवाज काढतात. सील्स,ओटर्स,पोलर बेअर्स हे प्राणी जमिनीवर जसे आवाज काढतात तसेच पाण्यात काढतात.जमिनीवर त्यांचे आवाज गर्जना, आरोळी,गुरगुर अशा प्रकारे असतात,तर पाण्यात ते क्लिक क्लिक असा किंवा शीळेची लकेर घातल्यासारखा आवाज काढतात.डॉल्फिन्सची शरीर रचना थोडी वेगळी असते,त्यांच्या स्वरयंत्रात व्होकल कॉर्ड्स म्हणजे स्वरतंतू नसतात.त्यामुळे ते आपल्या नाकाच्या पोकळीत हवा खेळवून ध्वनी निर्माण करतात. शिळेसारखा आवाज काढण्यापासून ते एखाद्या दरवाजाच्या करकरण्यापर्यंत अनेक प्रकारचे ध्वनी डॉल्फिन्स काढताना पाहायला मिळतात. एकंदरीतच निसर्गाचे आवाज असे अजब गजब आहेत

प्रशांत बाफना /8055440385

## शिरूर येथे विश्वकर्मा जयंती उत्साहात साजरी



शिरूरकासार:- )
सालाबादप्रमाणे याही वर्षी प्रभू भगवान विश्वकर्मा जयंती मोठ्या उत्साहात शहरात साजरी करण्यात आली.कारागिरांची देवता म्हणून भगवान विश्वकर्मा यांची ओळख असून शहरातील सुतार लोहार समाज बांधवांच्या वतीने जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात येत असते.शनिवारी सकाळी दहा वाजता प्रतिमा पूजन केल्यानंतर आरती संपन्न झाली.दुपारी बारा ते एक या वेळेत सिद्धेश्वर संस्थानचे उत्तराधिकारी विवेक महाराज शास्त्री यांचे प्रवचन झाले.त्यानंतर उपस्थित भाविकांना अशोक लाड यांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.या जयंती उत्सव सोहळ्याला शहराचे प्रथम नगराध्यक्ष रोहिदास पाटील गाडेकर यांच्यासह माजी उपनगराध्यक्ष बाबुराव झिरपे,नगरसेवक वसंत काटे,सावता कातखडे,दादासाहेब हरिदास,सामाजिक कार्यकर्ते अजिनाथ गवळी,ज्येष्ठ पत्रकार विजयकुमार गाडेकर,भारत पानसंबळ,प्रकाश साळवे,मनोज परदेशी,बालकृष्ण मंगरूळकर,नायब तहसीलदार विजय इंगळे,अशोक गायकवाड,अभय देसरडा,बबन मोरे,निलेश उगलमुगले,प्रताप कातखडे,गणेश मोरे,विठ्ठल कंठाळे,शंकर कातखडे आदींसह महिला भाविकांची देखील मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला उपस्थिती होती.

दैनिक लोकआरंभ
सोमवार २ फेब्रुवारी २०२६
www.lokaarambh.com



## संत रविदास व डॉ. आंबेडकरांचे विचार आजही दिशादर्शक – युवराज सोनवणे



शिरूर कासार ) संत शिरोमणी रविदास महाराज आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशात समता, बंधुता आणि राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यासाठी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांचे विचार आजही समाजासाठी दिशादर्शक आहेत, असे प्रतिपादन फुले–आंबेडकरी विचारांचे कृतिशील अभ्यासक व मुक्त पत्रकार युवराज सोनवणे यांनी केले. शिरूर कासार येथे दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी संत शिरोमणी रविदास महाराज जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी चर्मकार महासंघाचे राज्य अध्यक्ष प्रा. बाळकृष्ण हंकारे उद्घाटक म्हणून, तर प्रा. राम गायकवाड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. युवराज सोनवणे पुढे म्हणाले की, “समतेची लढाई भगवान बुद्धांपासून सुरू झाली. ती पुढे वारकरी व नाथ संप्रदायातील संतांनी पुढे नेली. या परंपरेतीलच एक महान संत म्हणजे संत रविदास महाराज.” संतांनी विषमतावादी जातीव्यवस्थेला कठोर शब्दांत आव्हान दिले; मात्र ती व्यवस्था मोडून काढण्यासाठी आवश्यक असलेली यंत्रणा उभी करता आली नाही. हे अपूर्ण कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून पूर्ण केले, असे त्यांनी ठामपणे सांगितले. आज समाजात सर्वत्र भगवे वस्त्र धारण करणारे अनेकजण दिसतात; मात्र ते संत तर दूरच, साधूही नाहीत. बहुतेक जण संधीसाधू असून त्यांची खरी ओळख त्यांच्या संपत्ती व कृत्यांवरून स्पष्ट होते. अनेक तथाकथित संत तुरुंगात गेल्याची उदाहरणे आपण पाहिली आहेत, असा घणाघाती आरोपही सोनवणे यांनी केला. कार्यक्रमात प्रा. बाळकृष्ण हंकारे, प्रा. राम गायकवाड, प्रा. श्रीराम जाधव, प्रा. भानुदास कंठाळे, प्रा. सुभाष गायकवाड तसेच शिवसेना (ठाकरे गट) तालुकाध्यक्ष सोपान मोरे यांनीही आपले विचार मांडले. या कार्यक्रमास ॲड. शेषराव पाखरे, प्रा. जयेंद्र निकम, सखाराम गायकवाड, विठ्ठल सरवदे, प्रकाश सुतार, सुरेखा सुतार, बाळासाहेब धनवे, सुनील कांबळे, राजेंद्र गुजर, मनोहर औसारमल, काळू सरवदे, शहादेव शेलार, अनिल वाघमारे, बाळासाहेब इंगळे, गोकुळ नन्नवरे, योगेश नन्नवरे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात संत रविदास महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. प्रास्ताविक जयंती उत्सव समितीचे मुख्य संयोजक छत्रपती नन्नवरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. जयेंद्र निकम यांनी केले

कोळवाडी (ता. शिरुर कासार) ः सिंदफणा नदीवर उभारलेल्या कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्याचे जलपुजन करताना आमदार सुरेश धस. यावेळी ग्रामस्था उपस्थित होते.

## सिंदफणा नदीवर साखळी बंधारे करुन कायम दुष्काळमुक्ती करण्याच संकल्प

### सुरेश धस ः कोळवाडी येथे बंधाऱ्याचे जलपुजन



(छायाचित्र ः मनोज मानकर)

शिरुर कासार () ः शिरुर कासार तालुक्याच्या दुष्काळी भागाला कायमस्वरुपी पाणी उपलब्ध व्हावे यासाठी पुढाकार घेत आहे. शिरुर कासार तालुक्यातील सर्वच भागात सिंदफणा नदीवर तसेच कापरी व अन्य नद्यावर गरजेनुसार साखळी बंधारे उभारण्यात येणार आहेत. अतिवृष्टीमुळे सिंदफणा नदीपात्राला मोठा फटका बसला असून झालेले नुकसान भरून काढण्यासाठी शासन स्तरावर आवश्यक उपाययोजना करण्यात असे आमदार सुरेश धस यांनी सांगितले.

कोळवाडी (ता. शिरुर कासार) येथे सिंदफणा नदीवर साडेतीन कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या कोल्हापूरी बंधाऱ्याचे जलपुजन आमदार सुरेश धस यांच्या हस्ते रविवारी (दि. १) झाले. भाजपचे तालुकाध्यक्ष सुरेश उगलमुगले, शिरुर कासारचे नगराध्यक्ष रोहिदास पाटील, पंचायत समितचे माजी नगराध्यक्ष बाबुराव केदार, माजी जिल्हा परिषद सदस्य शिवाजी पवार व माऊली आप्पा जरांगे, ज्येष्ठ नेते सुरेश थोरात, नगरपंचायतीचे गटनेते गणेश भांडेकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता कृष्णा पानसंबळ, नायब तहसीलदार गणेश दहिफळे, अहिल्यानगर जिल्हा मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष व वरिष्ठ पत्रकार सूर्यकांत नेटके, उपसरपंच नारायण मानकर, देविदास नेटके, पत्रकार अंगद पानसंबळ, युवक नेते सुधाकर नेटके, साईनाथ नेटके, ग्रामसेवक अशोक खाकाळ, पाडुरंग अभंग, भारत बनकर, साहित्यिक विठ्ठल जाधव, पोपट कनुजे, कल्याण तांबे, पत्रकार प्रकाश साळवे, सोनाजी मानकर, दत्ता पाटील सावंत, संदीपान नेटके, सरपंच सुदाम काकडे, यांच्यासह गावकरी व परिसरातील विविध गावचे सरपंच उपस्थित होते. आमदार सुरेश धस म्हणाले की, शिरुर कासार तालुक्यातील शेतीला मुबलक पाणी उपलब्ध व्हावे यासाठी आपले प्रयत्न सुरु आहेत. तालुक्यातील वाहणाऱ्या प्रमुख अशा सिंदफणा नदीवर कोळवाडी येथे बंधारा उभारल्याचा पाच ते सहा गावांना फायदा झाला असून सुमारे दिडशे हेक्टरपेक्षा अधिक शेती ओलीताखाली येणार आहे. या नदीवर तसेच कापरी व अन्य नद्यावर गरजेनुसार साखळी बंधारे उभारण्याचा संकल्प आहे. यामुळे बहुतांश गावांना पाणी उपलब्ध होईल असे नियोजन आम्ही करत आहोत. शेतकऱ्यांसाठी उभारलेले बंधारे केवळ सरकारच्या जबाबदारीवर सोडून चालणार नाहीत. सगळं काही सरकार करत नसते. हा बंधारा तुमच्यासाठीच निर्माण केला आहे, त्यामुळे शेतकऱ्यांनी दोन महिन्यांच्या आत बंधारा ताब्यात घ्यावा व त्याच्या दुरुस्ती व देखभालीची काळजी घ्यावी.” सिंदफणा नदीवर आणखी दोन बरेज बंधारे प्रस्तावित असून सध्या त्यासाठी सर्वेक्षण सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच, भविष्यात आवश्यक ठिकाणी आणखी बरेज बंधारे उभारण्याचा मानस असून यामुळे परिसरातील शेतीचा पाणी प्रश्न मोठ्या प्रमाणात मार्गी लागेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. निवृत्ती बेदरे सर यांनी सुत्रसंचालन केले तर पत्रकार सूर्यकांत नेटके आभार मानले.

------------

आदर्श दाखवून द्या ः सुरेश अण्णा धस

कोळवाडी येथील गावकऱ्यांची चाळीस वर्षाची मागणी यंदा पुर्ण झाली. त्याबद्दल गावकऱ्यांच्या वतीन प्रस्तावीकात पत्रकार सूर्यकांत नेटके यांनी या बंधाऱ्याचा शेतीला किती आणि कसा फायदा होत असल्याचे सांगत आभार मानले. सुरेश धस म्हणाले, “बंधाऱ्याला होण्याला खरं तर उशिर झाला. पण उशिराने झालेले काम चांगले आणि गोड आहे. आता बंधारा संभाळण्याची जबाबदारी गावकऱ्यांची आहे. यापुढे कायम पाणी साठवण टिकायचे असेल तर शेतकऱ्यांनी एकत्र येऊन तातडीने पाणी वापर संस्था स्थापन करुन बंधाऱ्याचा ताबा घ्या. कोळवाडीच्या गावकऱ्यांनी केलेला आदर्श मला इतर गावांत सांगता येईल असा या गावांतून आदर्श दाखवून द्या

## विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी अहिल्यानगर पोलीस दल सज्ज..! ४ हजार मुलींना आत्मनिर्भरतेचा दिला मंत्र.. शाळा-महाविद्यालयांत व्यापक जनजागृती अभियान

अहिल्यानगर ):-विद्यार्थिनींना सुरक्षित,स्वाभिमानी आणि आत्मविश्वासाने जगता यावे यासाठी अहिल्यानगर जिल्हा पोलीस दल व जाणीव ट्रस्ट, वसई-विरार यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालयांमध्ये व्यापक जनजागृती व मार्गदर्शन अभियान यशस्वीपणे राबविण्यात आले. दि.२८ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत इयत्ता ७ वी ते ९ वी मधील विद्यार्थिनींसाठी आयोजित या उपक्रमातून सुमारे ४ हजार विद्यार्थिनींना थेट मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात आले.या उपक्रमात वक्ते श्री.मिलिंद पोखर यांच्या माध्यमातून विद्यार्थिनींना समाजात आत्मनिर्भरतेने कसे उभे राहावे,आत्मविश्वास व स्वाभिमान जपून सुरक्षित जीवन कसे जगावे याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. यासोबतच समाजातील संभाव्य धोके,सायबर




गुन्हे,ऑनलाईन फसवणूक, सोशल मीडियावरील धोके यांची स्पष्ट माहिती देत प्रत्यक्ष जीवनातील उदाहरणांद्वारे विद्यार्थिनींना सजग करण्यात आले.मार्गदर्शनादरम्यान एक अत्यंत महत्त्वाची आणि संवेदनशील बाब अधोरेखित करण्यात आली.अनेक वेळा या वयोगटातील मुलींना ओळखीच्या,निकटवर्ती किंवा विश्वासातील व्यक्तींकडूनच त्रास सहन करावा लागतो. मात्र भीती, लाज किंवा जास्त विश्वासामुळे अशा घटना पुढे येत नाहीत. याबाबत विद्यार्थिनींना स्पष्टपणे सजग करण्यात आले. या संवादातून काही विद्यार्थिनींनी स्वतःवर झालेल्या त्रासाबाबत मनमोकळेपणाने आपली व्यथा मांडली, ही या उपक्रमाची मोठी उपलब्धी ठरली.या सर्व प्रकरणांची गांभीर्याने दखल घेत अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलाने संबंधित विद्यार्थिनींचा त्रास दूर करण्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य व पुढील कायदेशीर कार्यवाही तत्काळ केली,हे विशेष उल्लेखनीय आहे. यामुळे विद्यार्थिनींमध्ये पोलिसांविषयी विश्वास अधिक दृढ झाला आहे. हा समाजोपयोगी उपक्रम पुढील शाळा व महाविद्यालयांमध्ये राबविण्यात आला – केंद्रीय विद्यालय क्र. 01, भिंगार कॅम्प साई एंजल इंटरनॅशनल स्कूल, तवलेनगर अंबिका विद्यालय, केडगाव न्यू आर्ट कॉलेज, रेसिडेन्शियल, बालिकाश्रम रोड श्रीकांत प्रेमराज गुगळे विद्यालय, माळीवाडा प्रियदर्शनी विद्यालय, भिंगार भाऊसाहेब फिरोदिया व अशोक फिरोदिया विद्यालय, माळीवाडा ल. ना. होशिंग विद्यालय, जामखेड भिंगार हायस्कूल, भिंगार पोतदार इंटरनॅशनल हायस्कूल, केडगाव अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलाने स्पष्ट केले आहे की, विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी असे उपक्रम भविष्यातही सातत्याने राबविण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील ज्या शाळा, महाविद्यालये किंवा संस्था अशा प्रकारचे जनजागृती कार्यक्रम आयोजित करू इच्छित असतील, त्यांनी अहिल्यानगर पोलीस दलाशी संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.विद्यार्थिनींच्या सुरक्षित भविष्यासाठी पोलिसांचा हा उपक्रम निश्चितच दिशादर्शक आणि प्रेरणादायी ठरत आहे

## महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या राज्य सचिवपदी ॲड. अविनाश सोळुंके यांची नियुक्ती

बीड/प्रतिनिधी

महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या राज्य सचिवपदी बीड जिल्ह्यातील रुईलिंबा येथील ॲड. अविनाश सोळुंके यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर नियुक्ती युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मा. शिवराज मोरे यांनी अधिकृत आदेशाद्वारे जाहीर केली आहे.

शेतकरी कुटुंबातून आलेले व कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसलेले ॲड. अविनाश सोळुंके यांनी NSUI या विद्यार्थी संघटनेत मागील ८ वर्षे सातत्याने कार्य केले आहे. या कालावधीत त्यांनी NSUI



महाराष्ट्रचे सरचिटणीस म्हणून जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व न्यायहक्काशी संबंधित प्रश्नांवर त्यांनी प्रभावी भूमिका घेत अनेक आंदोलने, निवेदने व पाठपुरावे केले असून विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. नियुक्ती संदर्भात आपली अधिकृत प्रतिक्रिया व्यक्त करताना ॲड. अविनाश सोळुंके यांनी नमूद केले की, ही नियुक्ती केवळ संघटनात्मक जबाबदारी नसून बेरोजगार विद्यार्थी, युवक तसेच वंचित व दुर्बल घटकांच्या हक्कांसाठी सक्षम व निर्णायक लढा देण्याची जबाबदारी आहे. केंद्र व राज्य सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे वाढलेली बेरोजगारी, महागाई, शेती संकट व सामाजिक अन्यायाच्या विरोधात युवक काँग्रेस संघटनात्मक ताकदीने अधिक आक्रमकपणे रस्त्यावर उतरेल, असा ठाम निर्धार त्यांनी व्यक्त केला.

सदर नियुक्तीचे महाराष्ट्रभर विद्यार्थी, युवक तसेच काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून स्वागत व अभिनंदन व्यक्त करण्यात येत आहे.

## दांडी पौर्णिमा निमित्त सावळेद्वार–जाईचा देव येथे भाविकांसाठी अन्नदान व सेवाभावी उपक्रम..

### जय बजरंग मित्र मंडळ यांच्यातर्फे यात्रेकरूंना अन्नदान..






सोयगाव ता..
प्रतिनिधी सुनील चोरमले..
....

श्री क्षेत्र सावळेद्वार येथील जाईचे बाबा यात्रेच्या निमित्ताने जय बजरंग मित्र मंडळाच्या वतीने आलेल्या भाविक भक्तांसाठी अन्नदान व नाश्त्याची उत्तम व्यवस्था करण्यात आली. सोयगाव तालुक्यातील सावळेद्वार तसेच भोकरदन तालुक्यातील जाईचा देव येथे महानुभाव पंथीय श्री चक्रधर स्वामी यांचे प्राचीन मंदिर असून माघ पौर्णिमा अर्थात दांडी पौर्णिमेच्या निमित्ताने येथे दरवर्षी भव्य यात्रा महोत्सव साजरा केला जातो.

या यात्रा काळात भाविकांसाठी चहा, नाश्ता व जेवणाची व्यवस्था गावकरी, विविध मंडळे तसेच परिसरातील नागरिक आपल्या परीने मोठ्या प्रमाणात करतात. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सावळेद्वार येथील जय बजरंग मंडळाच्या वतीने भाविकांसाठी चहा-नाश्त्याची तसेच मंडप उभारून विश्रांतीची सोय करण्यात आली होती.

जाईचा देव येथील डोंगर भागातून तब्बल ८४० पायऱ्या उतरून खालच्या देवाचे दर्शन घेण्यासाठी येणाऱ्या भाविकांसाठीही परिसरातील व गावकऱ्यांच्या वतीने नाश्ता व जेवणाची व्यवस्था करण्यात आली. ही यात्रा ‘दांडी यात्रा’ किंवा ‘दांडी पौर्णिमा’ म्हणून ओळखली जाते.हि यात्रा सुमारे आठ दिवस चालते

या यात्रेसाठी देशभरातील विविध राज्यांतून महानुभाव पंथीय भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी उपस्थित राहतात. पुजारी मंडळींच्या वतीनेही भाविकांसाठी नाश्ता व जेवणाची व्यवस्था करण्यात येऊन सेवाभावाचे दर्शन घडले.

## “तीर्थाटन” योजना देवदर्शन घडविणार सवलतीच्या दरात एसटी महामंडळाचा पुढाकार

जिंतूर: राज्यात सर्वसामान्य भाविकांसाठी सवलतीच्या दरात माने सुरक्षितपणे राज्यातील धार्मिक स्थळाचे दर्शन व्हावे या करिता हिंदू हृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीचे औचित्य साधून राज्यातील राज्यमार्ग परिवहन महामंडळाने एसटी संगे तीर्थाटन ही विशेष योजना सुरू केलेली असून त्यानुसार परभणी जिल्ह्यातील जिंतूर आगारातून याबाबत नियोजन करण्यात आलेली असून मागणी होताच जिंतूर आगारातून बस उपलब्ध करून दिली जाणार असल्याची माहिती आगार व्यवस्थापक आनंद चव्हाण व बस स्थानक प्रमुख रामेश्वर सोनवणे यांनी दिली आहे.

सवलीच्या दरात आणि प्रवासातील सुरक्षितता अवलंबित सर्वसामान्य भाविकांसाठी ही सुरू केलेली योजना असून जिंतूर तालुक्यातील जास्तीत जास्त भाविकांनी या उत्कृष्ट तीर्थाटन योजनाचा लाभ घ्यावा.असेही कळविण्यात आलेले आहे. भाविकांनी मागणी केल्यास प्रत्येक आगारातून पाच बसेस या तीर्थाटन योजने साठी देणार असल्याचे कळते.

ही तीर्थाटन योजना स्वस्त व सुरक्षित या ब्रीद वाक्यावर आधारित आहे.खाजगी वाहतूक विशेषतः ट्रॅव्हल्स वाहतूक प्रवास दर अधिक जास्त प्रमाणात असतात व विशेषता सुरक्षितेचेचा अभाव असतो. आधी सर्व बाबींचा विचार करता राज्यातील एसटी महामंडळाने सर्वसामान्य



जिंतूर::: तीर्थाटन योजनेअंतर्गत तालुक्यातील वसा येथून पंढरपूर साठी रवाना झालेले भाविक भक्तजन सोबत चालक ठकाजी काळे व वाहक श्रीनिवास देशमुख.

प्रवासी वर्गाला भक्तांना खिशाला परवडेल अशी ही तीर्थाटन योजना सवलतीच्या दरात अमलात आणली असून या योजनेमुळे भक्ताना राज्यातील विविध देवदर्शन घडणार आहे.

-----------------------------------------

चाळीस प्रवाशांनी मागणी केल्यास बस होणार उपलब्ध

शहर अथवा ग्रामीण भागातील गावातून 40 प्रवाशांचा गट तीर्थाटन योजनेस तयार झाल्यास जिंतूर आगारातून बस तत्काळ उपलब्ध होणार असल्याची माहिती आगार व्यवस्थापक आनंद चव्हाण यांनी दिली.सध्या या योजना बाबत आगार व्यवस्थापक मोठ्या प्रमाणावर जनजागृती करताना दिसून येत आहे.

या योजनेसाठी एसटी आगारांनी आपल्या ताफ्यातील नव्या सुरक्षित आरामदायी बस देण्याचा निर्णय घेतला असून सुरक्षित प्रवास या वर अधिक भर दिला आहे.

-----------------------------------------

तीर्थाटन योजना ज्येष्ठ नागरिक महिला व इतरांसाठी

अमृत महोत्सव योजनेअंतर्गत ७५ वर्षांवरील जेष्ठांना मोफत प्रवास करता येईल मोफत प्रवास करता येईल तसेच महिला सन्मान योजनेअंतर्गत 50 टक्के सवलत तसेच इतर सामाजिक सवलतीही जशाच्या तशा लागू राहणार असून तीर्थाटन योजनेअंतर्गत बस उपलब्ध व्हावी यासाठी आगार प्रमुखाकडे मागणी करता येईल असे कळविण्यात आलेले आहे.

-----------------------------------------

एसटी संगे तीर्थाटन 23 जानेवारी 2026 पासून ही योजना राज्यातील 251 आगारात एकाच वेळी राबविण्यात येत असून जिंतूर आगाराचा समावेश आहे. प्रवाशांच्या मागणीनुसार प्रत्येक आगारातून किमान पाच बसेस या योजनेसाठी उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याने तीर्थक्षेत्र दर्शन करणे आता सवलतीच्या दरात सोयीचे होणार आहे.

## संतोष घसिंग यांच्या ” ऋतुसमिधांच्या आर्द्रा “ साठी मसापचा पद्मश्री नामदेव ढसाळ काव्य प्रतिभा पुरस्कार !



शिरूर कासार/ : कृषि अधिकारी तथा साहित्यिक संतोष विठ्ठल घसिंग यांच्या “ ऋतुसमिधांच्या आर्द्रा या कवितासंग्रहाला राजगुरुनगर येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेचा पद्मश्री नामदेव ढसाळ काव्यप्रतिभा सर्वोत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कार घोषित करण्यात आला आहे.ज्येष्ठ साहित्यिकांच्या हस्ते लवकरच हे पुरस्कार राजगुरुनगर येथे प्रदान करण्यात येणार आहेत.

वर्णमुद्रा शेगांव या प्रतिष्ठित संस्थेने हा कवितासंग्रह प्रकाशित केलेला असून या संग्रहात एकूण बारा विभागांत कवितांची विभागणी केलेली आहे.

ऋतुसमिधांच्या आर्द्रा , या कवितासंग्रहात निसर्गाच्या रुपकांना चैत्र ते फाल्गुन या मराठी बारा महिन्यांत गुंफलेले असून मानवी जीवनावर सखोल भाष्य करताना आयुष्याची निरर्थकता आणि सार्थकता व्यामिश्र स्वरूपात मांडताना ही कविता मराठीतील वेगळ्या बाजाला प्रतिमा सृष्टीच्या माध्यमातून ग्रेस ,आरती प्रभूंच्या अनुवंशिकप्रदेशात आणून तर सोडतेच पण निसर्गरुपी प्रतिमांच्या छायांना , पडछायांचे गोंदण चढवताना तीव्र असे मातीचे भान देते.डॉ. पी.विठ्ठल यांनी कालिदासांच्या” ऋतुसंहार” ह्या कवितासंग्रहाची आठवण करून देणारा हा संग्रह आहे.अशा गौरवपर शब्दांनी प्रस्तुत कवितेची पाठराखण केली आहे.

या अगोदर संतोष विठ्ठल घसिंग यांचे कादंबरी व कवितासंग्रह मिळून एकूण बारा पुस्तके प्रकाशित असून त्यांच्या सर्वच पुस्तकांना राष्ट्रीय व राज्य पातळीवरील पुरस्कार प्राप्त आहेत

# राष्ट्रवादीचं विलीनीकरण होणार होतं का?

## फडणवीसांनी सगळं खरं सांगून टाकलं

माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर आता त्यांच्या पत्नी सूनेत्रा पावर यांनी राज्याच्या उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली आहे. त्या राज्यातील पहिल्या महिला उपमुख्यमंत्री ठरल्या आहेत. अजितदादा यांच्या निधनानंतर आता राष्ट्रवादी पक्षात घडामोडी वाढल्या आहेत. येत्या 12 फेब्रवारी रोजी दोन्ही राष्ट्रवादी गटाचे विलीनीकरण होणार होते, असा दावा केला जातोय. विशेष म्हणजे खुद्द खासदार शरद पवार यांनीच अजित पवार आणि माझ्यात याविषयाची चर्चा झाली होती, असे सांगितले आहे. त्यानंतर आमदार जयंत पाटील यांनीदेखील दोन्ही राष्ट्रवादी एकत्र करण्यासाठी अनेक बैठका झाल्या होत्या. लवकरच विलीनीकरणाची घोषणा केली जाणार होती, असे सांगितले आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे नेते तथा खासदार सुनिल तटकरे यांनी मात्र हा दावा फेटाळला आहे. त्यामुळेच दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणावर अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. असे असतानाच आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कथित विलीनीकरणावर थेट भाष्य केले आहे. त्यामुळे आता नव्या चर्चेला तोंड फुटले आहे. देवेंद्र फडणवीस नेमकं काय म्हणाले?

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांचे विलीनीकरण आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाचे अधिकार यावर फडणवीस यांनी भाष्य केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा स्वतंत्र अस्तित्त्व असलेला पक्ष आहे. त्यांच्या पक्षाचे निर्णय तेच घेतात. आमची त्यांचे मित्र आहोत. ते



आमच्या सोबत राहिलेले आहेत. म्हणूनच आम्ही त्या पक्षासोबत पूर्ण ताकदीने उभे

तसेच, शरद पवार, जयंत पाटील यांच्या दाव्यावर बोलताना दोन्ही राष्ट्रवादी पक्षांमध्ये एकत्रिकरणाची चर्चा अंतिम टप्प्यात गेली असती तर अजितदादांनी आम्हाला सांगितलं असतं. अजितदादा आमच्या सरकारमध्ये आहेत. सरकारमध्ये असताना आमच्याशी चर्चा न करता ते विलीनीकरणाचा निर्णय घेऊ शकतील का? असा प्रश्न देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित केला. विलीनीकरणाची तारीख ठरली असती तर त्यांनी आम्हाला सांगितलं असतं अशी पुष्टीही फडणवीस यांनी जोडली. आता शरद पवार आणि अजितदादा यांच्यात काय बोलणं झालं, याची मला कल्पना नाही. मी आमच्यापुरतं सांगतो की राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या तारखेची कल्पना आम्हाला नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# मढीच्या कानिफनाथ देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्ष पदी विठ्ठल मरकड यांची तर सरचिटणीस पदी सौ माधुरी मरकड यांची निवड!

अहिल्यानगर: संपूर्ण महाराष्ट्रात भटक्यांची पंढरी म्हणून प्रसिद्ध असलेल्या अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील श्री क्षेत्र मढी येथिल कान्होबा उर्फ कानिफनाथ देवस्थान ट्रस्टच्या नव निर्वाचित अध्यक्ष पदी विठ्ठल राधाकिसन मरकड तर सरचिटणीस पदी सौ माधुरी गणेश मरकड यांची निवड करण्यात आली. कानिफनाथ देवस्थान ट्रस्टच्या कार्यालयात सर्व विश्वस्तांची बैठक आयोजित करण्यात आली होती.त्या बैठकीत ज्या निवडी जाहीर करण्यात आल्या त्या पुढील प्रमाणे आहेत.१) विठ्ठल राधाकिसन मरकड -[अध्यक्ष],२) सुरसिंगराव माधवराव पवार -[उपाध्यक्ष],३)सौ माधुरी गणेश मरकड -[सरचिटणीस], ४) अनिल अशोक साठे -[चिटणीस],५) दादासाहेब शिवराम मरकड- [कोषाध्यक्ष],६) महादेव बबन कोकाटे -[कार्याध्यक्ष],७) उत्तम शंकरराव मरकड -[विश्वस्त],८) तानाजी रामचंद्र धसाळ -[विश्वस्त],९) तानाजी हिरामण शिंदे -[विश्वस्त],१०) मदन विष्णू मरकड -[विश्वस्त],११)सौ.उषा संतोष मरकड -[विश्वस्त] या प्रमाणे एकूण ११ जणापैकी ६ पदाधिकारी आणि



५ विश्वस्तांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या आहेत.या कार्यकारी विश्वस्त मंडळाचा कार्यकाळ हा दिनांक १९ जानेवारी २०३१ पर्यंत वैध राहील.नवीन पदाधिकाऱ्यांनी या देवस्थान च्या कार्यकारी मंडळात कोणत्याही प्रकारची गटबाजी न करता सर्वांना विश्वासात घेऊन नाथ महात्म्य व नाथभक्त वाढीसाठी आपला अमूल्य वेळ देऊन कानिफनाथ देवस्थान ट्रस्टचा स्वच्छ कारभार केला जाईल असे आश्वासन दिले.शेवगाव -पाथर्डी विधानसभा मतदारसंघाच्या भाजपच्या हॅट्रिक आमदार मोनिकाताई राजळे यांनी आजपर्यंत गडाच्या विकास कामांसाठी मागिल मंडळास शासन स्तरावरून फार मोठा भरीव स्वरूपात निधी उपलब्ध करून दिला होता.नवीन विश्वस्त मंडळ ही आमदार मोनिकाताई राजळे यांच्या मार्गदर्शना खाली या गडाचा स्वच्छ कारभार करील असे नविन कार्यकारी विश्वस्त मंडळा कडून सांगण्यात आले आहे.नवीन कार्यकारिणी सदस्यांनी कानिफनाथ देवस्थान ट्रस्टच्या गडाच्या विकास कामाची माहिती समजावून घेतली.आगामी यात्रा उत्सव काळात करावयाच्या उपाययोजना संबंधी कामाचा तपशील लक्षात घेऊन पुढील वाटचाली साठी सुरुवात केली आहे. कान्होबा उर्फ कानिफनाथ देवस्थानच्या कर्मचारी वर्गाच्या वतीने नविन विश्वस्तांना पुष्पहार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी सर्व पदाधिकारी उपस्थित होते. प्रारंभी स्वागत मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक पवार यांनी केले तर आभार व्यवस्थापक संजय मरकड यांनी मानले

# माजलगावात संत गुरु रविदास व संत कंकैय्या महाराज सार्वजनिक जयंती महोत्सव उत्साहात साजरा



माजलगाव, दि. १ प्रतिनिधी : शहरामध्ये प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी संत रविदास महाराज व संत कंकैय्या महाराज सार्वजनिक जयंती महोत्सव 01 फेब्रुवारी रोजी वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक माजलगाव या ठिकानी उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन बहुजन नेते बाबुराव पोटभरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती नितीन नाईकनवरे, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, शहरप्रमुख धनंजय सोळंके, आझाद क्रांती सेनेचे राजेश घोडे, विलास नेमाने, अविनाश जावळे, पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर, कमलेश जाब्रस, उमेश जेथलिया, हरिष यादव, पुरूषोत्तम करवा, अमर साळवे, बाळासाहेब आडागळे, परमेश्वर सोळंके, धनंजय माने, यांचेसह अनेक मान्यवरांनी अभिवादन केले. जयंती महोत्सव यशस्वी करण्यासाठी बाजार समितीचे सचिव तथा जयंती अध्यक्ष हरिभाऊ सवणे जयंतीचे मार्गदर्शक, आयोजक, निमंत्रक व सर्व जयंती कमिटीने परिश्रम घेतले.

# बीड येथे कंटिन्यूअस प्रोफेशनल डेव्हलपमेंट कार्यक्रम उत्साहात संपन्न..

## कृष्णाई नर्सिंग इन्स्टिट्यूट केज तर्फे सीपीडी कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन..

केज ! प्रतिनिधी रेणुका माता कृषी विकास प्रतिष्ठान संचलित कृष्णाई इन्स्टिट्यूट ऑफ बी.एससी. नर्सिंग तसेच महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल यांच्या संयुक्त विद्यमाने बीड येथे कंटिन्यूअस प्रोफेशनल डेव्हलपमेंट (CPD) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास नर्सिंग तसेच वैद्यकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर, तज्ज्ञ, प्राध्यापक व नर्सिंग व्यावसायिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे सेक्रेटरी श्री. अतुल विक्रमराव मुंडे व श्रीमती रूपालीताई अतुल मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रम प्रसंगी प्रमुख मान्यवर म्हणून डॉ. राम आव्हाड सर (गायनॅकॉलॉजिस्ट), जिल्हा रुग्णालय बीड तसेच डॉ. ऋषिकेश पानसंबळ सर (पीडियाट्रिक स्पेशालिस्ट), जिल्हा रुग्णालय बीड यांची उपस्थिती लाभली. यासोबतच श्रीमती रंजना दाणे (असिस्टंट मॅट्रन, जिल्हा









रुग्णालय बीड) व श्रीमती पाटील मॅडम (नर्सिंग इन्चार्ज, उपजिल्हा रुग्णालय बीड) यांनीही कार्यक्रमाला उपस्थित राहून मार्गदर्शन केले. मान्यवरांनी नर्सिंग व वैद्यकीय क्षेत्रातील सद्यस्थिती, भविष्यातील संधी तसेच गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा देण्यासाठी सतत व्यावसायिक विकासाचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कृष्णाई इन्स्टिट्यूट ऑफ बी.एससी. नर्सिंगचे प्रभारी प्राचार्य प्रवीण खुणे सर यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज, सातारा येथील सानप धनराज सर, तुषार खाडे सर, अनिस मुला सर, मेघराज सानप, राहुल कोकणे सर, युवराज सानप तसेच ॲड. नारायण शिरसाट सर यांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमासाठी प्रमुख प्रवक्ते म्हणून ओंकार जगदाळे सर (इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन, मुंबई), प्रवीण जरांगे सर, जायभाये सर तसेच नितीन मोराळे सर (एस.आर.टी.एस., अंबाजोगाई) यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. प्रवक्त्यांनी नर्सिंग शिक्षणातील बदल, व्यावसायिक विकासाचे महत्त्व, आधुनिक आरोग्यसेवा पद्धती तसेच करिअरच्या नव्या संधी यावर सखोल व प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमात नर्सिंग क्षेत्रातील वाढत जाणाऱ्या संधी, आरोग्यसेवेमधील तंत्रज्ञानाचा वाढता वापर तसेच वैद्यकीय क्षेत्रातील झपाट्याने होणारे आधुनिकीकरण यावर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. बदलत्या काळानुसार वैद्यकीय व नर्सिंग क्षेत्रात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी नवे तंत्रज्ञान आत्मसात करून कौशल्यवृद्धी करणे व बदलत्या जगासोबत जुळवून घेणे आवश्यक असल्याचे मत वक्त्यांनी व्यक्त केले. नर्सिंग व्यवसाय हा केवळ सेवा नसून उज्ज्वल करिअर संधी देणारे क्षेत्र असल्याचे सांगत, अशा सातत्यपूर्ण प्रशिक्षण व व्यावसायिक विकास कार्यक्रमांमुळे नर्सिंग कर्मचाऱ्यांचा आत्मविश्वास, कार्यक्षमता व गुणवत्ता वाढते, असेही यावेळी नमूद करण्यात आले. या कार्यक्रमामुळे उपस्थित नर्सिंग व्यावसायिकांना नवे ज्ञान, अनुभव व दिशा मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजक कृष्णाई इन्स्टिट्यूट ऑफ बी.एससी. नर्सिंग व महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलचे सर्वत्र कौतुक करण्यात आले.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com